Marketing and Publicity
Head Office
agmmkt@mahabank.co.in; cmmedia@mahabank.co.in

# प्रसिद्धीसाठी

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर चालू आणि बचत खात्याच्या व्यवहारावरील सेवा शुल्क माफ

**पुणे, मार्च 23, 2020**: बँक ऑफ महाराष्ट्रने चालू आणि बचत खात्यामधील व्यवहार जसे की, इतर बँकांच्या एटीएममधुन रोख रक्कम काढणे / बिगर-आर्थिक व्यवहार, इंटरनेट बँकिंग - मोबाईल बँकिंग आदी डिजिटल वाहिन्यांद्वारे एनईएफटी पाठवणे आणि कोणत्याही शाखेतून रोख पैसे काढणे या सर्व व्यवहारांवरील सेवा शुल्क कोविड-19 अर्थात कोरोना साथीच्या संक्रमण पार्श्वभूमीवर दिनांक 24 मार्च 2020 पासून ते 15 एप्रिल 2020 पर्यंतच्या कालावधीसाठी माफ केले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या ग्राहकांना त्यांच्या बँकिंग गरजा भागवण्यासाठी शक्य तितक्या डिजिटल व्यवहारांसाठी डिजिटल चॅनेल वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेतून हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारत सरकार आणि विविध राज्य सरकारांनी कोविड -19 साथीचे संक्रमण नियंत्रित करण्यासाठी अभूतपूर्व पावले उचलली आहेत.